महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक / नाविमं / प.मा. / 2032
दिनांकः– 03 / 07 / 2024

प्रति,

मा. संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स,
नागपूर–440001

विषयः– जुलै / ऑगस्ट–2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत. (**Hall Ticket**)...
संदर्भः– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं. / परीक्षा–7 / 2649, दि. 02 / 07 / 2024.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जुलै / ऑगस्ट–2024 मध्ये आयोजित करण्यात येणा–या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रानी बातम्यांचे वेळी विनामुल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

सहपत्रः–प्रकटनाची प्रत

1) प्रति, सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–4 यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2) प्रति, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) प्रति, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा यांना लेखी स्वरूपात निदर्शनास आणून दयावे.
4) प्रति, मा. संचालक, आकाशवाणी केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या आकाशवाणी केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
5) प्रति, मा. संचालक, दूरदर्शन केंद्र नागपूर, यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या दूरदर्शन केंद्रावरुन बातम्याचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
6) मा. संपादक, दै.......................................................................यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनास आपल्या वृत्तपत्रातून तात्काळ विनामूल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.
7) मुख्याध्यापक / प्राचार्य, सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर विभाग, नागपूर यांना कळविण्यात येते की, सदर प्रकटनानुसार कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.
## प्रकटन

**विषय :- जुलै–ऑगस्ट २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत** (Hall Ticket)...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) जुलै–ऑगस्ट २०२४ परीक्षेसाठी सर्व विभागीय मंडळातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सर्व माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना जुलै–ऑगस्ट २०२४ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर गुरूवार, दिनांक ०४/०७/२०२४ पासून School/College login मध्ये download करण्याकरीता उपलब्ध होतील. या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. जुलै–ऑगस्ट २०२४ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी व इ. १०वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.
२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा/प्राचार्यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.
३. प्रवेशपत्रामध्ये (Hall Ticket) विषय व माध्यम बदल असतील तर त्यांच्या दुरुस्त्या माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात समक्ष जाऊन करून घ्यावयाच्या आहेत.
४. प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्याचे नाव या संदर्भातील दुरुस्त्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करुन त्यांची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरीत पाठवावयाची आहे.
५. प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुनःश्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.
६. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावयाची आहे.

तरी जुलै–ऑगस्ट २०२४ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक/प्राचार्य, सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक : ०२/०७/२०२४

(शैलेंद्र पाटील)
(प्र) सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र कमांक / नाविमं / प.मा. /2033
दिनांकः– 03 / 07 / 2024

प्रति,

मुख्यध्यापक / प्राचार्य.
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.
भंडारा, चंद्रपुर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया.

विषयः– जुलै / ऑगस्ट–2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत. (Hall Ticket)...
संदर्भः– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र कमांक रा.मं. / परीक्षा–7 / 2648, दि. 02 / 07 / 2024.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै / ऑगस्ट–2024 साठी विभागीय मंडळातील सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (Hall Ticket) उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना जुलै / ऑगस्ट–2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर गुरूवार, दिनांक–04 / 07 / 2024 पासून School/College login मध्ये download करण्याकरीता उपलब्ध होतील.

या संदर्भात काही तांत्रिक अडचण उद्‌भवल्यास माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधणे अनिवार्य आहे.

तरी जुलै / ऑगस्ट–2024 च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा व कनिष्ठ महाविद्यालय तसेच सर्व प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर.

प्रत माहिती तथा योग्य कार्यवाहीस्तव :–

1) सचिव महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–4 यांना माहितीस्वत समादराने अग्रेषित.
2) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांना समादराने अग्रेषित.
3) शिक्षणाधिकारी (माध्यमिक व उच्च माध्यमिक) जि. प. भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यकक्षेतील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा यांच्या लेखी निदर्शनास अणून दयावे.